MHJN030003602024

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.७, जालना यांचे न्यायालयातील**
(पिठासीन अधिकारी श्रीमती पी. व्ही. शिंदे)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१९४/२०२४** **निशाणी–०७**
(पोलीस ठाणे, ता. जालना गु.र.नं.६३९/२०२३)

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक ०३.०८.२०२६)

सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती डी. आर. श्रृंगारे, आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.एस. राठोड यांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप, त्या अनुषंगाने सरकार पक्षाने सादर केलेला तोंडी व लेखी पुरावा, त्यास आरोपीला घेतलेला बचाव इत्यादीवरुन खालील मुद्दे माझे विचाराधीन आलेले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह त्यापुढे नमुद केलेले आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, आरोपी दिनांक २६.०९.२०२३ रोजी विना परवाना अवैधरित्या देशी दारू बाळगुन स्वतःच्या अर्थिक फायद्याकरीता विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून असताना मिळून आली, आणि म्हणून तिने मुंबई मद्यनिषेध कायदा कलम ६५(अ)(इ) अन्वये गुन्हा केला आहे ? | नाही. |
| २. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

०२. अभियोग पक्षाने आरोपीवर ठेवण्यात आलेला दोषारोप शाबीत करण्यासाठी साक्षीदार क्र.१ नितीन मधुकर झोटे, साक्षीदार क्र.२ पी.एम. पवार व साक्षीदार क्र.विकास भगवान कांबळे यांची साक्ष नोंदविलेली आहे. अभिलेखावर आरोपीविरुध्द पुरावा आल्याने परंतु आरोपी गैरहजर असल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**मुद्दा क्र. १ व २ करीताः–**

०३. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी साक्षीदार क्र.१ नितीन मधुकर झोटे याने त्याच्या सरतपासादरम्यान, फिर्यादमधील मजकुराची पुनरावृत्ती करून फिर्याद शाबीत केली. तर आरोपीच्या विद्वान विधीज्ञांनी घेतलेल्या उलटपासावेळी छापा टाकलेल्या ठिकाणाबाबत सांगु शकत नसल्याचे आणि इतर सुचक प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली.

०४. साक्षीदार क्र.२ पी.एम.पवार हा तपासी अधिकारी असुन त्याने प्रकरणावर प्रकाश टाकुन सरतपासादरम्यान, जप्ती पंचनामा, रासायनिक तपासणीसाठी दिलेल्या पत्राची प्रतशाबीत केली. तर आरोपीच्या विद्वान विधीज्ञांनी घेतलेल्या उलट तपासावेळी इतर सुचक प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली.

०५. साक्षीदार क्र.३ विकास भगवान कांबळे हा पोलीस साक्षीदार त्याने जबाबाप्रमाणे कथन केले. आरोपीच्या विद्वान विधीज्ञांनी घेतलेल्या उलट तपासावेळी छापा टाकलेल्या ठिकाणाबाबत सांगु शकत नसल्याचे आणि छाप्या ठिकाणी बनावट ग्राहक पाठवला नसल्याचे कथन करून इतर सुचक प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली.

०६. प्रस्तुत प्रकरण हे २ वर्ष जुने असुन वारंवार आणि पुरेशी संधी देवुनही उर्वरीत

साक्षीदारांना हजर ठेवण्यास सरकार पक्ष अपयशी ठरल्याने निशाणी क्र.१ खाली आदेश पारित करून सरकारपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. करिता आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता सरकारपक्षाने केवळ ३ साक्षीदारांच्या साक्षीवर भिस्त ठेवली आहे.

०७. साक्षीदार क्र.१ ते ३ यांनी जरी अभियोग पक्षास मदत होईल अशी साक्ष दिली असली तरी अभियोग पक्षाने पंच साक्षीदार व इतर स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष नोंदवली नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द होवु शकले नाहीत. तसेच अभियोगपक्षाने रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल दाखल केला आहे. परंतु जप्त मुद्देमालाचा रासायनिक पृथक्करणासाठी गेलेल्या नमुन्याचा पंचनामा नसल्याने तो सीलबंद होता का याची योग्य ती काळजी घेतली किंवा नाही या महत्वाच्या बाबी जप्ती पंच व नमुना वाहक यांच्याकडून सिध्द झाले नसल्याने जप्त मुद्देमाल गावठी दारू होती किंवा नाही याबाबत शंका निर्माण होते. तसेच जप्ती पंचनामा स्वतंत्र साक्षीदारामार्फत शाबीत झालेला नाही. जप्त मुद्देमालाच्या नमुन्याचा रासायनिक पृथक्करण अहवाल असला तरी नमुना काढण्याच्या प्रक्रियेत शंका उत्पन्न झाल्याने सदर अहवाल आरोपीची दोषनिश्चिती करताना ग्राह्य धरता येणार नाही. सबब अभियोग पक्षाने दिलेला पुरावा आरोपीविरुद्धचा दोषारोप संशयापलीकडे सिद्ध करण्यास पुरेसा नाही. करीता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देऊन मुद्दा क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी अर्चना गिरीधारी जाधव याची मुंबई मद्यनिषेध कायदा, १९४९ चे कलम ६५(अ)(ई) प्रमाणे असलेल्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमालाची अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार रुपये १५,०००/– चे जामीन बंधपत्र सादर करावे.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. )

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRIYANKA VISHVAKANT SHINDE
Date: 2026.08.03 17:49:43 +0530

जालना. **(श्रीमती पी. व्ही. शिंदे)**

दिनांक: ०३.०८.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या.क्र.७, जालना.